# डोंबिवलीतील विद्यार्थ्यांची 'नासा' सफर

## अंतराळ संस्थेतील थरारक अनुभवांतून अवकाश संशोधनाची प्रेरणा

प्रतिनिधी, डोंबिवली

**डोंबिवलीतील बारा विद्यार्थ्यांनी** अमेरिकेतील केनेडी स्पेस सेंटर 'नासा' येथे तीन दिवस वास्तव्य करून अंतराळातील अनुभवांचे थरार अनुभवले. स्वतःमधील कौशल्य, नैपुण्य सिद्ध करून दाखवण्याची संधी या विद्यार्थ्यांना 'नासा'मध्ये मिळाली. मिळालेल्या अनुभवातून काही विद्यार्थ्यांनी अंतराळ क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल होईल अशा पद्धतीने अंतराळ क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला आहे.

डोंबिवलीतील एज्यू इंटरनॅशनल संस्थेतर्फे शहरातील गुरुकुल द डे स्कूल, ओंकार इंटरनॅशनल, मॉडेल स्कूल शाळेतील बारा विद्यार्थी अमेरिकेतील 'नासा' येथे तीन दिवसांच्या प्रशिक्षण शिबिरासाठी गेले होते. इयत्ता सातवी ते अकरावीचे विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले होते. संस्थेचे डॉ. प्रमोद शिंदे, रूपाली पाटील यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना 'नासा'तील थरार अनुभवायला मिळाला. तेथील मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना 'नासा'चे कार्य, अंतराळात जाण्यासाठी घ्यावयाचे प्रशिक्षण, तेथील वास्तव्यात करायच्या हालचाली यांची माहिती दिली. विद्यार्थ्यांचे कलागुण तपासण्यासाठी त्यांना अभियांत्रिकी विषयाचे प्रकल्प देऊन ते त्यांच्याकडून करून घेतले. या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट प्रकल्पाला पारितोषिक देण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना नासातर्फे प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या शिबिराला अजित करकरे, गौरी करकरे, दर्शना सामंत, मधुकर चक्रदेव, डॉ. अरुण पाटील, लीना मॅथ्यू, पल्लवी भोसले यांचे सहकार्य मिळाले.



### 'नासा'त काय अनुभवले?

- शून्य गुरुत्वाकर्षणात अवकाशात (भिंतीवर) चालण्याचा थरार.
- अटालांटिक स्पेस शटलला वापरण्यात येणारे उष्णतारोधक आवरण आणि त्याचे प्रात्यक्षिक.
- हे आवरण खराब झाल्याने अंतराळवीर कल्पना चावलाचा मृत्यू कसा झाला याची माहिती.
- शटल लाँचचा थरार, प्रक्षेपण स्थानकापर्यंत अंतराळवीरांना घेऊन जाणारी व्हॅन यांचा अनुभव.
- विद्यार्थ्यांनी रॉकेट बनवून ती प्रक्षेपित केली. स्पेसक्राफ्टचे कार्य, ते अंतराळात उतरवणे याची माहिती घेतली.
- सात वेळा अंतराळात जाऊन आलेले अंतराळवीर जेरी रॉस यांच्या अनुभवाचा खजिना ऐकायला मिळाला.

" 'नासा'बद्दल आपणास ओढ होतीच. ती प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी शालेय जीवनात मिळाली. पुढील काळात आपण अंतराळवीर बनण्याचा नक्कीच प्रयत्न करणार आहोत.

– श्रीती मालपुरे

" अंतराळ क्षेत्राचा आपण येत्या काळात अभ्यास करणार आहोत.

– नील मॅथ्यू

### सहभागी विद्यार्थी

नील मॅथ्यू, रुचिरा शर्मा, गार्गी पवार, वैभवी पाटील, मानव पांडे, प्रणव कुलकर्णी, साईनाथ म्हात्रे, श्रुती मालपुरे, लक्षिता बोरकर, प्राजक्ता नाखवा, आदिती पाटील आणि सिद्धी भोसले.